बातमीपत्र

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

माहिती कक्ष, दि ०७ ऑगस्ट २०२४

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३६४/२०२४ भा.न्या सं क ३०३(२) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०६/०८/२०२४ रोजी १०.०० वा. ते ११.३० वा. अशोक चौक सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०६/०८/२०२४ रोजी २१.५२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सिराज उद्दीन हुसने शेख,वय-३२ वर्षे,रा- घरनं ७६,दमाणी नगर भैरव कॉलनी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | १०,०००/- रू ची देवत कंपनीची मेटल कंटीग मशिन पिवळया व काळया रंगाची |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, फिर्यादीचे अशोक चौक गायकवाड हॉस्पीटल जवळील विडप चालू बांधकामाचे समोरील मोकळया जागेतून देवत कंपनीचे मेटल कटींग मशीन ही कोणीतरी अज्ञात चोरटयाने संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेले आहे.म्हणून. तपासः- पोह/१५७४/पटेल- |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६१०/२०२४ भा.न्या सं क ११५(२),११८(१),३५१(२),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०५/०८/२०२४ रोजी १८.०० वा. गुरूप्रसाद हॅाटेल सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०६/०८/२०२४ रोजी ०२.५२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | असलम सरदार शेख,वय-३९ वर्षे,रा-आंबेडकर नगर होटगी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) गुरूप्रसाद हॅाटेल मालक २) मालकाचा मुलगा ३) इतर दोन अज्ञात इसम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि ०५/०८/२०२४ रोजी १८.०० वा च्या सुमारास फिर्यादी व त्याचा भाऊ स्टेशन समोरील नमुद हॅाटेलात नाष्टा करण्यास गेले असता तेथे फिर्यादीने वेटरला पकोडा व जामून ची ऑर्डर दिली ऑर्डर आल्यावर फिर्यादीस पकोडे कच्चे तळलेले वाटल्याने फिर्यादीने वेटरला परत तळून दे असे म्हणाले असता वेटरने फिर्यादीस आमच्याकडे तसेच पकोडे भेटतात असे म्हणाल्याने त्यावरून वाद होवून यातील आरोपीतांनी लाथाबुक्यांने मारहाण करून तसेच फिर्यादीस लोखंडी पाईप मारून जखमी केले व भाऊ ईसाक यास लाथाबुक्यांने मारहाण केली आहे.म्हणून. तपासः- मपोह/२७०/लांबतूरे- ९५५२५६१२७० |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ३६६/२०२४ भा.न्या सं क ३०५(ए),३३१(३) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि ३०/०७/२०२४ रोजी ०९.३० वा ते १४.३० वा. पर्यत प्रताप नगर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ०६/०८/२०२४ रोजी २३.३२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | अशोक मल्लेश धुळराव,वय-४३ वर्षे,रा- २४,हरळया नगर विजापूर रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | ५४,०००/- रू त्यात उज्जवल कंपनीचे सोलार कंट्रोल सिस्टीम ०२ इक्साईटचे बॅटरी ३०० फुट वायर,३०० फुट दोरी,ब्ल्यूटयूथ स्पिकर शेती. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे प्रताप नगर येथे शेतातील घराला कुलूप लावून सोलापूर येथील घरी आल्यावर कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे वरील वर्णनाचे व किंमतीचे साहित्या हे कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या समंतीवाचुन मुद्दाम लबाडीने चोरून नेले आहे.म्हणून. तपासः- पोह/११९२/हार-९६५७७१०५६५ |